# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## परिपत्रक क्र. २०७/२०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये ज्या अध्यापकांना त्याच महाविद्यालयात/परिसंस्थेत शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत, फक्त अशा अध्यापकांचे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीताचे मुदतवाढीचे **(continuation)** प्रस्ताव संस्थेच्या ठरावासह, नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हता, शोध निबंध प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने दि. ३१/०८/२०२४ पर्यंत सादर करण्याबाबत परिपत्रक क्र. १३८/२०२४ अन्वये कळविण्यात आले होते. असे असतानाही अनेक महाविद्यालयांनी अशा अध्यापकांचे मुदतवाढीचे **(continuation)** प्रस्ताव विहित मुदतीत सादर केलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात काही महाविद्यालयांनी दूरध्वनीद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीताचे मुदतवाढीचे **(continuation)** प्रस्ताव सादर करण्यास लिंक सुरू करण्याबाबत विनंती केलेली आहे.

या परिपत्राकाद्वारे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करीताचे मुदतवाढीचे **(continuation)** प्रस्ताव दि. ०१/०९/२०२४ ते दि. १५/०९/२०२४ या (१५ दिवस) कालावधीत ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. तद्नंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

2/9/2024

(स. द. डाखर)
**उपकुलसचिव**

जावक क्र. सीसीओ/४३२८
दिनांक – ०२ सप्टेंबर, २०२४

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था